# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव विभाग

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/ २०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १०/०६/२०२४ चे ठराव.**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६११** **विषय क्रमांक- ३६११**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- प्राथमिक शिक्षण**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६११ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.प्राशिवि/०९/कावि/१०४/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, “द हिंदू ग्रुप” यांचेकडील साप्ताहीक वृत्तपत्र The Hindu Young World विदयार्थ्यांना वाटप करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६११ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.प्राशिवि/०९/कावि/१०४/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थानसाठी विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत असतात. बहुतांश विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील असलेने या विद्यार्थांना मनपाच्या वतीने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थांना अंक उपलब्ध करणेत येईल. त्यास अनुसरून प्राथमिक शिक्षण विभागाकडील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत ११० प्राथमिक शाळा कार्यरत असून त्यापैकी १)फकीरभाई पानसरे उर्दू चिंचवडस्टेशन २) हुतात्मा चाफेकर विद्या मंदिर चिंचवड ३)इंद्रायणीनगर प्राथमिक शाळा भोसरी ४) पिंपळेगुरव प्राथमिक शाळा पिंपळे गुरव ५)काळजेवाडी प्राथमिक शाळा च-होली ६) सोनवणेवस्ती प्राथमिक शाळा ७) यशवंतराव चव्हाण उर्दू प्राथमिक शाळा थेरगाव ८) संत तुकारामनगर प्राथमिक शाळा या आठ प्राथमिक शाळांची मागणी “द हिंदू ग्रुप” यांनी केलेली आहे. सदरच्या शाळेतील मुख्याध्यापक यांनी मागील शैक्षणिक वर्षामधील विद्यार्थी संख्या कळविल्याप्रमाणे एकून विद्यार्थी संख्या ३६५६ आहे. सदरचा अंक हे ०२ विदयार्थांमागे ०१ याप्रमाणे १८२८ इतके अंक विद्यार्थांना द्यावे लागणार आहे. अंक र.रु.८.००/- प्रती प्रमाणे उपलब्ध करून देणेबाबत कळविलेले आहे. सदर अंक हे ४० आठवडे १२ महिनेकरीता ( शालेय सुट्ट्या वगळून) उपलब्ध करून द्यावे लागणार आहे. सदरचा खर्चास किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास, थेट पध्दतीने खरेदी केल्यास र.रु.५,८४,९६०/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सन २०२४-२५ मध्ये “विद्यार्थी स्वयंअध्ययन साधने” या लेखाशिर्षकावर सद्यस्थितीत र.रु.१७,००,०००/- तरतूद शिल्लक आहे त्यामधून सदर खर्च करणे शक्य आहे. सदर खर्चामध्ये वाढ / घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर योजना थेट पध्दतीने राबविणेकामी येणा-या अपेक्षित खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१२** **विषय क्रमांक- ३६१२**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१२ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/१३४/२०२४ दि.०६/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहराच्या घनकच-याच्या विघटनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारणे या साठी निविदा अटी नूसार VGF अदा करणे व वाढ घट करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६१२ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/१३४/२०२४ दि.०६/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मनपाक्षेत्रामध्ये जमा होणा-या कच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने विघटनासाठी मोशी कचरा डेपो येथे १००० TPD चे MRF उभारणे, ५०० TPD चे कंपोस्ट प्लान्ट उभारणे तसेच ७०० TPD चे वेस्ट टू एनर्जी प्लान्ट उभारण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदरची निविदा DBOT तत्वावर असून पिंपरी चिंचवड मनपामार्फत सदर प्रकल्पाला ५० कोटी अर्थसहाय्य वेगवेगळ्या टप्प्यावर देण्याचे मंजूर केले होते. ठेकेदाराने १००० TPD चे MRF व ५०० TPD चे कंपोस्ट प्लान्ट उभारूण दि.०१/०८/२०२३ रोजी कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे ७०० TPD चे वेस्ट टू एनर्जी प्लान्ट दि.०५/१०/२०२३ रोजी कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदरचे काम पूर्ण केले असल्याने ठेकेदार M/s. Antony Lara Renewable Energy यांनी दि.१२/०४/२०२३ च्या पत्रान्वये ५० कोटी अर्थसहाय्याचे ९०% म्हणजे ४५ कोटी मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे. याबाबत प्रकल्पाचे सल्लागार M/s. Tandon Urban Solutions Pvt.Ltd (TUSPL) यांचेकडून अहवाल मागितला असता त्यांनी निविदा अटी व शर्तीचा विचार करून त्यांचा याबाबतचा अहवाल दि.१२/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये निविदा अटी व शर्ती क्र. 23:2:3 अन्वये ५० कोटी पैकी ५०% रक्कम म्हणजे २५ कोटी रक्कम ठेकेदाराला देणेबाबत शिफारस केली आहे. सदर प्रकल्पाला स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत VGF साठी अर्थसहाय्य मिळणेकामी महाराष्ट्र शासनामार्फत भारत सरकारच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहे. सदर योजनेतून ठेकेदाराला देय अदा करायचे नियोजन होते. त्यामुळे सदर कामाला महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील क' अंदाजपत्रकातील मनपा फंडामध्ये फक्त रक्कम रूपये १० लाख इतकीच तरतूद करण्यात आलेली आहे. सदर कामाला तरतूद कमी पडत असल्याने खालिल प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणे आवश्यक आहे. |

| अ. क्रं | बजेट कोड क्रं | कामाचे नाव | लेखाशिर्ष | बजेट पान क्रं/. अ.क्रं | सन २०२३-२४ च्या मुळ उपलब्ध तरतुद | वाढ | घट | सुधारित तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 22230810 5 | मनपाच्या घनकचरा प्रक्रियेसाठी वेस्ट टू एनर्जी प्लॅन्ट उभारणे. | भांडवली 'क' अंदाजपत्रक | ४७९ /१ | 10,00,000/- | 25,00,00,000/- | - | 25,10,00,000/- |
| २ | | नदी सुधार प्रकल्प मनपा हिस्सा. | नदी सुधार प्रकल्प | १/६ | 20,00,00,000/- | - | 20,00,00,000/- | - |
| ३ | 22231282 1 | मोशी कचरा डेपो येथील वेस्ट टू एनर्जी प्लॅन्ट चालन ,देखभाल व दुरूस्ती करणे तसेच सॅनिटरी लॅन्डफीलचे देखभाल दुरूस्ती करणे ) सल्लागार | महसूली क | ५३७ /१ | 20,00,00,000/- | - | 5,00,00,000/- | 15,00,00,000/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | फी व टिपींग फी सह( | | | | | | |
| | एकुण | | | | | | 40,10,00,000/- | 25,00,00,000/- | 25,00,00,000/- | 40,10,00,000/- |
| | तरी वरीलप्रमाणे सदर कामाच्या सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकाच्या तरतुदीमध्ये वाढ - घट करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. | | | | | | | | | |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** | | | | | | | | | |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१३** **विषय क्रमांक- ३६१३**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१३ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/१३५/२०२४ दि.०६/०६/२०२४ अन्वये, केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत Reform Incentive घटकांतर्गत प्राप्त निधी पर्यावरण विभागातील कामास वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६१३ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/१३५/२०२४ दि.०६/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सध्यस्थितीत भाटनगर मैलाशुद्धीकरण केंद्र ३० दशलक्ष लिटर क्षमतेचा असून त्यामध्ये क्षमतेपेक्षा जास्त पाणी येत असल्याने तसेच भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता, निर्माण होणाऱ्या पाण्याची आवश्यकता लक्षात घेता सदर ठिकाणी ४५ दशलक्ष लिटर क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र आवश्यक होते. त्यास अनुसरून सदर ठिकाणी जुना मैलाशुद्धीकरण केंद्राचे नूतनीकरण करण्याचे कामाची र. रु. ३१.६१ कोटी रक्कमेची निविदा काढून काम हाती घेण्यात आले असून त्यास चालू आर्थिक वर्षात निधीची आवश्यकता आहे. तरी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नागरी प्रकल्पांच्या परिणामकारक अमलंबजावणीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस Reform Incentive म्हणून मंजूर झालेला र.रु.१५,००,००,०००/- इतका निधी पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील 'चिंचवड भाटनगर येथिल जुन्या मैलाशुद्धीकरण केंद्राचे नुतनीकरण करुन क्षमता वाढविणे' या कामास वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१५** **विषय क्रमांक- ३६१५**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- जलशुध्दीकरण केंद्र से.२३**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१५ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/८५/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पवना धरणापासुन से. क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईपलाईन टाकणे – या कामासाठी ठेकेदाराने केलेल्या क्लेम्सबाबत मनपाची बाजू मांडणेकामी नेमणेत आलेले वकीलांची फी अदा करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६१५ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/८५/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाचे काम बऊर येथील गोळीबार दुर्घटनेमुळे ऑगस्ट २०११ पासुन मा. महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये बंद असल्यामुळे ठेकेदार मे. एनसीसी – एसएमसी – इंदू (जेव्ही) यांनी दि.२५/०३/२०१९ रोजीच्या पत्रांन्वये निविदा समाप्तीची (Termination Notice) सुचना दिलेली आहे. तसेच मनपाकडे नुकसान भरपाई देखील मागितलेली आहे. सदर नुकसान भरपाई बाबत निर्णय घेणेकामी त्रयस्थ लवाद नेमणेकामी मा. महाराष्ट्र राज्य शासन यांनी दि.१२/०४/२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मुख्य न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश श्री. संदिप के. शिंदे यांची लवाद (Arbitrator) म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. तसेच सदर लवाद मध्ये मनपाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी मा. उच्च न्यायालयाचे वकील श्री. केदार बी. दिघे यांची नेमणुक करणेबाबत मा. कायदा सल्लागार यांनी दि.१४/०२/२०२४ रोजी प्रस्तावित केलेनुसार मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाचे वकिल श्री. केदार बी. दिघे यांचेकडील दि. ०१/०४/२०२४ रोजीच्या मागणी पत्राद्वारे एकुण र.रू.४०,००,०००/- एवढी फी मिळणेबाबत कळविलेले आहे. त्यापैकी ५०% रक्कम आगाऊ व उर्वरीत ५०% रक्कम युक्तीवाद सुरू होणेपुर्वी मागितलेले आहे. म्हणजेच एकुण फी र. रू. ४०,००,०००/- रक्कमेपैकी ५०% म्हणजेच र.रू.२०,००,०००/- आगाऊ व र.रू.२०,००,०००/- युक्तीवाद सुरू होणेपुर्वी अदा करावी लागणार आहे. सदरची फी कायदा विभागाकडे तरतुद नसलेने पाणीपुरवठा विभागाने अदा करावी असे मा. कायदा सल्लागार यांनी दि. ३/४/२०२४ च्या पत्रान्वये कळविले आहे. वकील श्री.केदार बी. दिघे यांची र.रू.४०,००,०००/- फी अदा करणेच्या खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे. लोकसभेची आचारसंहिता चालु असल्यामुळे मा. स्थायी समिती सभा होणार नसल्याने उमेद मान्यतेवरती उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये वकील श्री. केदार बी. दिघे यांच्या फीबाबत अदा करणेबाबत मा. आयुक्त यांची मान्यता घेणेत आली होती त्याअनुषंगाने वकील श्री. केदार बी. दिघे यांना र.रू.१०,००,०००/- एवढी फी अदा करण्यात आलेली आहे. सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात पाणीपुरवठा टप्पा १ JNNURM अंतर्गत पवना धरणातुन सेक्टर क्र. २३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत थेट पाईपलाईन टाकणेच्या ठेकेदाराचे क्लेम्स अदा करणे या कामासाठी र. रू. १००,००,००,०००/- एवढी तरतुद करणेत आलेली आहे (पान क्र. ६४८ अ.क्र. ३) या कामाअंतर्गत वकील श्री. केदार बी. दिघे यांची फी अदा करता येणे शक्य आहे. तरी पवना धरणापासुन से. क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी आणणेसाठी थेट पाईपलाईन टाकणेच्या कामासाठी ठेकेदाराने केलेल्या क्लेम्सबाबत मनपाची बाजू मांडणेकामी नेमणेत आलेले वकील श्री.केदार बी. दिघे यांची एकुण र.रू.४०,००,०००/- एवढी फी पाणीपुरवठा टप्पा १ JNNURM बजेट पान क्र. ६४८ अ.क्र. ३ या कामामधुन अदा करणेसाठी मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. वकील श्री. केदार बी. दिघे यांची फी एकुण र. रू. ४०,००,०००/- पैकी र.रू.२०,००,०००/- आगाऊ व उर्वरित र.रू.२०,००,०००/- युक्तीवाद सुरू |

| | |
|---|---|
| | होणेपुर्वी अदा करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१६** **विषय क्रमांक- ३६१६**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- वाय सी एम एच**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१६ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/१०/कावि/१०६/२०२४ दि.२६/०४/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय. पिंपरी येथे डॉ.डी.वाय.पाटील नर्सिंग कॉलेज पिंपरी, पुणे मधील तृतीय वर्ष बी.एस.सी नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी क्लिनिकल पोस्टिंगसाठी परवानगी मिळेबाबत व क्लिनिकल पोस्टिंग प्रशिक्षण देण्याकरिता संलग्नतेसाठी करारनामा (M.O.U)करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६१६ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/१०/कावि/१०६/२०२४ दि.२६/०४/२०२४ अन्वये, प्राचार्य डॉ.डी.वाय.पाटील नर्सिंग कॉलेज पिंपरी, पुणे दि.०१/०४/२०२४ च्या महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या मिडवाइफरी /ऑब्स्टेट्रिक आणि गायनॅकॉलॉजीकल विभागातील कामकाजाचे प्रशिक्षण/ निरीक्षणकरण्याची परवानगी सदर संस्थेतील विद्यार्थ्यांना मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ६०१७ दि. १३/०२/२०१४ चे संमत ठरावानुसार विविध संस्थाना रुग्णालयात सरावासाठी असणारी आवश्यक फी भरून मनपाच्या रुग्णालयामध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या सरावाकरीता उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता देणेत आलेली आहे. यापुर्वीमुख्य वैद्यकीय विभागामार्फत् करण्यात आलेल्या करारनामाच्या धर्तीवर प्रत्येक वर्षासाठी र.रु.२५,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस हजार फक्त) याप्रमाणे ३ वर्षासाठीएकूण र.रु.७५,०००/ (अक्षरी र.रु. पंच्याहत्तर हजार फक्त) अनामत रक्कम जमा करुन तसेच महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. एचएसपी-२०१५/प्र.क्र.१९६/शिकाना/शिक्षण-१, दि. १२ डिसेंबर २०१७ मधील अटी व शर्तीनुसार आकारावयाचे सुधारित शुल्क प्रति विद्यार्थी प्रतिदिनी र.रु. १५०/- याप्रमाणे शुल्क आकारुन प्रतिवर्षी १०% वाढ करण्यात येईल. तसेच वेळोवेळी होणा-या शासन निर्णायानुसार जो बदल लेखी स्वरुपात होईल त्या धोरणानुसार रचनात्मक बदल करण्यात येईल. सदर डॉ.डी.वाय.पाटील नर्सिंग कॉलेज पिंपरी,पुणे संस्था तसेच यापुढे बी.एस.सी. नर्सिंगयोजनेअंतर्गत क्लिनिकलसाठी मिडवाइफरी /ऑब्स्टेट्रिक आणि गायनॅकॉलॉजीकल नर्सिंग (OBG) नर्सिंग प्रशिक्षणासाठी येणा-या सर्व संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणेकामी मा. अधिष्ठाता यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार शासन निर्णयप्रमाणे अनामत रक्कम व शैक्षणिक शुल्क स्विकारनेस व सदर अनामत रक्कम (येणे-देणे) परत करणेस मा.अधिष्ठाता पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांचेमार्फत अनामत घेणेस व परतावा करणेस तसेच पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात |

| | |
|---|---|
| | विदयार्थ्यांना क्लिनिकल पोस्टिंगप्रशिक्षण देण्याकरिता संलग्नतेसाठी करारनामा (M.O.U) मा. अधिष्ठाता यांच्या मान्यतेने करणे आवश्यक असल्याने त्यास तसेच जमा होणारे शैक्षणिक शुल्क हे पी.जी.आय. वाय सी एम एच इतर जमा या लेखाशिर्षकात जमा करण्यास व अनामत रक्कम DEPOSIT OF CONTRACTOR- ठेकेदार अनामत - Accounts - 3rd Part या लेखाशिर्षकात जमा करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१७** **विषय क्रमांक- ३६१७**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- वाय सी एम एच**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१७ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/१३/कावि/६४/२०२४ दि.२०/०५/२०२४ अन्वये, पदव्युत्तर पदवी संस्थेतील नीति समितीकडे सादर करण्यात येणा-या शोधनिबंध मसुदा व इतर शोध प्रकल्प मसुद्यांकरीता प्रक्रीया शुल्क फी वाढीबाबत. |
| **ठराव क्र.३६१७ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/१३/कावि/६४/२०२४ दि.२०/०५/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक- ४ मार्च, २०१४ अन्वये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आरोग्य विभागाने मान्यता दिलेली आहे. तसेच सध्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात औषधवैद्यकशास्त्र, सर्जरी, स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र, बालरोग, अस्थिरोगशास्त्र, भूलशास्त्र, विकृतीशास्त्र, कान, नाक व घसा शास्त्र, मानसोपचारशास्त्र, नेत्ररोग चिकित्सा, उरोरोगशास्त्र, प्रतिबंधात्मक आणि सामाजिक औषधशास्त्र व त्वचारोग अशा १३ विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झालेला असून विद्यार्थी उत्तम प्रकारे शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थी डॉक्टरांचा रूग्णसेवेमध्ये चांगला उपयोग होत आहे. तसेच एम. डी. विकृतीशास्त्र (M.D. Pathology), एम. डी. भूलशास्त्र (M. D. Anesthesiology), एम. एस. स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (M. S. Obstetrics and Gynaecology) या तीन विषयांमध्ये विद्यार्थ्यांची प्रवेशक्षमता वाढ करण्याकरीता प्रस्ताव छाननी शुल्क महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मुंबई यांना अदा करणेत आलेले आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या किमान मानंकानुसार [MSR 50] प्रमाणे पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात निती समिती आवश्यक आहे. निती समितीत विविध विभागांचे विभागप्रमुख, तज्ञ डॉक्टर्स, वकील, नीति समिती अध्यक्ष, सामाजिक शास्त्रज्ञ, सामान्य व्यक्ती इ. सर्व अभ्यागतांची उपस्थिती आवश्यक तथा बंधनकारक असते. निती समितीत निर्णय घेण्यापुर्वी निती समितीची केंद्रीय परवाना समिती, महासंचालक औषध परवाना, नवी दिल्ली भारत सरकार यांच्याकडे नोंदणी करून परवाना क्रमांक मिळविणे आवश्यक असते. त्या बाबत डॉ. तुषार पाटील, विभागप्रमुख पँथॉलॉजी विभाग तथा सेक्रेटरी नीती समिती,पदव्युत्तर संस्था,वाय.सी.एम.रुग्णालय यांनी केद्र शासनाकडे अर्ज व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करून नीति समितीचा नोंदणी क्र. ECR/१२३६/Inst/MH/२०१९, दि. ०४ जुलै २०१९ रोजी |

प्राप्त केला आहे. तसेच सदर परवाना नूतनीकरण करण्याकरीता २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी निती समितीच्या परवाना नूतनीकरणासाठी अर्ज सादर केला आहे. सद्यस्थितीत मा. आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.वायसीएमएच / ५ / कावि / ६८३ / २०२०, दि.०९/०६/२०२०अन्वये पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी सादर कलेल्या शोध प्रकल्पाच्या मसुद्यांना परवानगी देण्यापुर्वी त्यांनी महापालिकेकडे किमान र.रु.१०००/- (अक्षरी र.रु.एक हजार फक्त) व इतर शोध प्रकल्प मसुद्यांकरीता प्रक्रीया शुल्क फी व वार्षिक पुनरावलोकन शुल्क फी (Initial Processing fees and Annual review fees) पुढील तक्त्यात नमूद केले प्रमाणे भरून घेत आहे.

| No. | Type Projects | Initial Processing fees | Mode of Payment | Annual review fees | Mode of payment |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Pharmaceutical industry sponsored Projects | 60000/- +TAX | Cheque | 10000/- + TAX | Cheque |
| 2 | Govt. sponsored Projects | 7000/- +TAX | Cheque/ Cash | 1000/- | Cash |
| 3 | Thesis/Dissertation | 1000/- | Cash | NIL | NA |
| 4 | Other academic Projects (institutional academic) | 1500/- | Cash | NIL | NA |

आता पर्यंत उक्त शुल्क प्राप्तीद्वारे Dean PCMC PGI YCMH PIMPRI या बँक खात्यावर दि.२८/०३/२०२४ इतकी आज अखेर जमा र.रू.४२,९१,५३८/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख एक्यान्नव हजार पाचशे अडोतीस फक्त) इतकी आहे. मूंबई महानगरपालिका संचलित शेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व के. ई. एम हॉस्पिटल यांनी दि.१५/०७/२०२० पासून वाढीव शुल्क आकारण्यास सुरूवात केली आहे. सदरचे शुल्क खालील प्रमाणे तक्त्यात नमूद केले आहे.

| **No.** | **Type Projects** | **Processing fees** | **Annual review fees** |
|---|---|---|---|
| 1 | **PHARMA sponsored Initial Submission** | **85000/-+TDS (10%)** | **20000/-+TDS (10%)** |
| 2 | **Govt. sponsored Initial Submission** | **10000/-+TDS (10%)** | **5000/-+ TDS (10%)** |
| 3 | **Thesis/Dissertation Initial Submission** | **1500/- (In hand Cash)/ NEFT** | **NIL** |
| 4 | **Other academic (OA) (Including DNB, DM, Nursing, Phd Research) Initial** | **2500/- (In hand Cash)/ NEFT** | **NIL** |

Note : Processing fees will increase by 5% for each year in month of March rounded up to next 100.

पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी व इतर संस्थांनी सादर केलेले शोधनिबंध याची प्रक्रीया शुल्क फी उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे मूंबई महानगरपालिका संचलित शेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व के. ई. एम हॉस्पिटल, मुंबई यांचेकडुन वसुल केली जाते. सदर संस्था ही सरकारी संस्था असल्याने त्याप्रमाणे वाढीव प्रक्रीया शुल्क फी यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील पदव्युत्तर संस्थेमध्ये आकारल्यास पिंपरी चिंचवड

| | |
|---|---|
| | महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते तसेच आजारांवर संशोधन होऊन रूग्णांवर उपचार उत्तम प्रकारे होऊन मनपाचे नावलौकीकात भर पडेल. उक्त नमुद केलेप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचे शेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व के. ई. एम हॉस्पिटल यांचे निती समितीने निश्चित केलेल्या वाढीव शुल्क/फी प्रमाणे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे पदव्युत्तर पदवी संस्थेस सन २०२४ – २०२५ या शैक्षणिक वर्षापासुन व तसेच पुढील सर्व शैक्षणिक वर्षाकरीता निती समितीकडे सादर होणा-या शोधनिबंध व इतर शोधप्रकल्प मसुदा यांकरीता लागु करावे असे मत आहे. सदरच्या प्राप्त होणा-या धनादेशाची रक्कम मा. अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था, यांचे नावे काढण्यात यावा. तसेच प्रक्रीया शुल्क फी वायसीएम रूग्णालयाचे सन २०२४-२०२५ या अंदाजपत्रकामधील "पी. जी. आय. वाय सी एम एच इतर जमा" या लेखाशिर्षावर जमा करणे आवश्यक आहे. सबब सदर वाढीव प्रक्रीया फी आकारणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१८** **विषय क्रमांक- ३६१८**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- वाय सी एम एच**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१८ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/६/कावि/५१६/२०२४ दि.०४/०६/२०२४ अन्वये, मनपाचे वाय.सी.एम.रुग्णालयाअंतर्गत शंकरराव मासूळकर नेत्र रुग्णालया मध्ये वर्ग-३ व वर्ग-४ पदांचे कर्मचारी पुरविणेचे कामास मुदतवाढ देणेबाबत. |
| **ठराव क्र.३६१८ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/६/कावि/५१६/२०२४ दि.०४/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरिता नोंदणीकृत संस्थेमार्फत विविध पदांवरील अधिकारी-कर्मचारी आऊटसोर्सिंगद्वारे नेमणेकामी एजन्सी नियुक्त करणेकामी आदेश निर्गत केले आहेत. मा.आयुक्त सो यांनी दि.०९/०३/२०२ च्या मान्य प्रस्तावान्वये वाय.सी.एम.रुग्णालयाकरिता अनुबंधीत संस्थेकडून मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. या संस्थेकडून वर्ग-३ व वर्ग-४ पदांचे कर्मचारी शंकरराव मासुळकर नेत्ररुग्णालयाकरिता पुरविणेबाबत तसेच याकामी होणा-या खर्चास मा.प्रशासक (मा.स्थायी समिती) यांचेकडील ठराव क्र.१३७७,दि.२१/०३/२०२ तसेच अधिष्ठाता यांचेकडील कामाचा आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/२१६/२०२३, दि.२८/०४/२०२३ अन्वये मान्यता दिली आहे. सदर मुदत दि.३०/०४/२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. विहीत अनामत भरुन घेणेचे अधीन व करारनामा करणेचे अटीवर मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांचे मार्फत वाय.सी.एम.रुग्णालया अंतर्गत शंकरराव मासुळकर नेत्ररुग्णालयामध्ये वर्ग-३ व वर्ग-४ पदांचे प्रपत्र-अ मधील कर्मचारी दि.०१/०५/२०२४ ते ३०/०९/२०२४ अखेर कालावधीसाठी पुरवठा करणेचे कामास मुदतवाढ देणेस व त्यांचे एकत्रित वेतन-किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन, सेवाशुल्क व इतर अनुषंगिक खर्च इ.साठी होणारा प्रत्यक्ष खर्च वाय.सी.एम. रुग्णालयाकडील "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षातुन खर्ची टाकणेस मान्यता असावी. तसेच किमान वेतन अदायगीस येणा-या र.रु.१३,०१,८७३/- प्रतिमाह प्रमाणे पाच महीन्यांचे र.रु.६५,०९,३६५/- (अक्षरी र.रु.पासष्ट लाख नऊ हजार तीनशे पासष्ट फक्त) तसेच कामगार कल्याण विभागाकडील वेळोवेळी होणा-या वाढीनुसार खर्चास मा.प्रशासक यांची कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६१९** **विषय क्रमांक- ३६१९**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- ब क्षेत्रीय स्थापत्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६१९ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/काविज/०९/५४/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, "चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वार्ड संबधित कामे करणे.", या कामासाठी प्रकल्प सल्लागार(PMC) म्हणून नेमणुक करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६१९ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/काविज/०९/५४/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ब',क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१८, मधील चिंचवड येथे तालेरा रुग्णालय (सावित्रीबाई फुले रुग्णालय) इमारत आहे. सदर इमारतीमध्ये तळमजला व तिसरा मजला जळीत रुग्णांच्या उपचारासाठी वैद्यकीय विभागाकडून मा. आयुक्तसो यांचे परवानगीने निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामुळे तालेरा रुग्णालय (सावित्रीबाई फुले रुग्णालय) हे जळीत रुग्णांच्या उपचारासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामधील एकमेव हॉस्पिटल असणार आहे. सदर ठिकाणी जळीत रुग्णांच्या उपचारासाठी व अद्यावत सोई सुविधासह बर्न वार्ड करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने वैद्यकीय विभागाचे डॉ. गोफणे, डॉ. संगीता थिरूमणी, मे. बेरी बिल्टस्पेस डिजाईन्स प्रा. लि.चे कार्यकारी संचालक वास्तुविशारद श्री. नितीश बेरी व स्थापत्य विभागाचे सह शहर अभियंता श्री. ज्ञानदेव जुंधारे, कार्यकारी अभियंता अनिल शिंदे, उप अभियंता राजकुमार सूर्यवंशी हे स्थळ पाहणीस दि. १४/०२/२०२४ रोजी उपस्थित होते. सदर स्थळपाहणी वेळी वास्तुविशारद श्री. नितीश बेरी यांनी तळमजल्यावर एक ट्राएज एरिया करावी लागेल त्यासाठी सुधारित इमारत आराखड्यास मंजुरी घ्यावी लागेल असे सांगितले. दि.१४/०२/२०२४ रोजीचे पाहणी दरम्यान व बैठकीमधील झालेल्या चर्चेनुसार मे.बेरी बिल्टस्पेस डिजाईन्स प्रा. लि.चे कार्यकारी संचालक वास्तुविशारद श्री. नितीश बेरी यांनी सदर कामासाठी प्रकल्प खर्चाचे २.०० टक्के दराने विषयांकित कामासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून काम करण्याची तयारी दि. १६/०२/२०२४ रोजीच्या पत्रानुसार दर्शविलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिखली येथील ८५० बेडच्या हॉस्पिटल विकसित करणेकामी क्र.स्था/नि/BRTS/५१०/२०२१, दि. ०१/०६/२०२१ व सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे यांचे बारामती येथे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय बांधकामासाठी जा.क्र. लेखा/निविदा/३७१९/ सन २०२२, दिनांक १०/०५/२०२२ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे मे. बेरी बिल्टस्पेस डिजाईन्स प्रा. लि. यांना अशा स्वरूपाच्या हॉस्पिटल विषयक कामांचा अनुभव आहे. मे. बेरी बिल्टस्पेस डिजाईन्स प्रा. लि. यांना हॉस्पिटल विषयक कामांचा अनुभव व उपरोक्त बाबींचा विचार करता, "चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वार्ड संबधित कामे करणे." या कामाचे निविदा पूर्व व निविदा पश्चात कामासाठी तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. बेरी बिल्टस्पेस डिजाईन्स प्रा. लि. यांची मा. आयुक्तसो यांची मान्यता घेऊन तसेच |

| | |
|---|---|
| | मा. स्थायी समितीची मान्यता घेऊन नेमणूक करणे आवश्यक आहे. सबब, " चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वार्ड संबधित कामे करणे." कामासाठी आवश्यक नकाशे बांधकाम परवानगी विभागामार्फत मंजूर करणेकामी संपूर्ण कार्यवाही करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, जागेवरील प्रत्यक्ष कामासाठी सर्व नकाशे तयार करणे इ. निविदा पूर्व व निविदा पश्चात कामासाठी मे. बेरी बिल्टस्पेस डिजाईन्स प्रा. लि. यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच प्रकल्प खर्चाचे २.०० टक्के दराने फी अदा करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६२०** **विषय क्रमांक- ३६२०**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- पाणीपुरवठा क क्षेत्रीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६२० दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पापु/क्षेका/टे.क्र.११/३२/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी, च-होली या भागात पाण्याची जलवाहिनी टाकणे, आर.सी.सी., ई.एस.आर. व जी.एस.आर. बांधणे (पॅकेज-१) या कामांतर्गत हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (HPCL) यांची पेट्रोल वाहिनी क्रॉस करून फिडर मेन टाकणेसाठी विमा (Special contingency liability policy) काढणेकामी रक्कम अदा करणेबाबत. |
| **ठराव क्र.३६२० दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पापु/क्षेका/टे.क्र.११/३२/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या 'इ' कार्यक्षेत्रातील पॅकेज-१ अंतर्गत डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी, च-होली या भागात पाण्याची जलवाहिनी टाकणे, आर.सी.सी., ई.एस.आर. व जी.एस.आर. बांधणे (Package -१) ह्या प्रकल्पाचे काम चालू आहे. या प्रकल्पाच्या रस्त्यातून भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉपोरेशन लिमिटेड (HPCL) यांची मुंबई-पुणे-सोलापूर उच्च दाब पेट्रोल वाहिनी जात असलेने पाणीपुरवठा विभागाची ६०० मी.मी. व्यासाची इनलेट व आउटलेट जलवाहिनी टाकणेकरिता विषयांकित वाहिनी (पेट्रोल वाहिनी) ओलांडणे आवश्यक आहे व त्याकरिता मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉपोरेशन लिमिटेड (HPCL) यांचा ना-हरकत दाखला इकडील विभागास मिळणे आवश्यक आहे. मे. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉपोरेशन लिमिटेड (HPCL) यांनी पेट्रोल लाईन क्रोसिंग करिता ना-हरकत प्रमाणपत्र देणेसाठी पर्यवेक्षण शुल्क त्यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकचा र.रु.२,४८,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) अधिक १८% GST असा एकूण र.रु.२,९२,६४०/- (अक्षरी र.रु.दोन लक्ष ब्याण्णव हजार सहाषे चाळीस फक्त) ची मागणी इ.सी.एस. द्वारे व र.रु.२.५० कोटी रुपयांचा सार्वजनिक दायित्व विमा (Public Liability Industrial Policy) उतरविणेबाबत कळविले आहे. सदरचा विमा उतरविणेकरिता सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी मर्या. यांचेकडून दि.१४/०५/२०२४ रोजी दर (हफ्ता) मागवीणेत आला होता व त्यानुषंगाने त्यांनी र.रु.८८,०५७/- (अक्षरी र.रु.अठठ्याऐंशी हजार सत्तावण्ण फक्त) इतका हफ्ता कळविला आहे. प्रस्तुत प्रकरणी पर्यवेक्षण शुल्क र.रु.२,९२,६४०/- (अक्षरी र.रु.दोन लाख ब्याण्णव हजार सहाशे चाळीस फक्त) व इन्शुरन्स शुल्क र.रु.८८,०५७/- (अक्षरी र.रु.अठठ्याऐंशी हजार सत्तावण्ण फक्त) इतका येणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३६२१** **विषय क्रमांक- ३६२१**

**दिनांक – १०/०६/२०२४** **विभाग- पाणीपुरवठा ब क्षेत्रीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३६२१ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/१/कावि/८४/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पवना धरणातून से.क्र. २३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे" च्या कामामधील जागा भाडे व सुरक्षा रक्षकांचे बिल १ मे २०१९ पासून ३१ मार्च २०२४ पर्यंतचे बिल संबंधित ठेकेदारासोबत झालेल्या करारानुसार अदा करणे तसेच मुदतवाढ देणेबाबत. |
| **ठराव क्र.३६२१ दिनांक - १०/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/१/कावि/८४/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पवना थेट पाईप लाईन प्रकल्पामधील आणलेले साहित्य ठेवणेसाठी संबंधित कामाचे ठेकेदार यांनी जागा भाड्याने घेतलेल्या आहेत. तसेच सदर साहित्यांचे रक्षण करणेसाठी सुरक्षा रक्षक ठेकेदाराची नेमणूक करणेत आली आहे. सदर जागेचे भाडे व सुरक्षा रक्षकांची देयके देणे बाबत संबंधित कामाचे ठेकेदार, जागा मालक तसेच सुरक्षा रक्षक ठेकेदार मागणी करीत आहेत. त्या अनुषंगाने दि. १७/०८/२०२३ रोजी स.११.०० वा. अति आयुक्त (१) दालन, ४ था मजला, महापालिका भवन येथे बैठक झाली आहे. सदर बैठकीमध्ये जागा मालकांचे भाडे व सुरक्षा रक्षकांचे देयक मे २०१९ पासुन पुढे प्रत्यक्ष पाईप्स व इतर सामुग्री स्थलांतरीत होई पर्यंत करारनाम्यातील दराप्रमाणे पवना थेट पाईप लाईन प्रकल्पाचे ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना अदा करणेत यावे असे ठरले आहे. त्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार यांना जागा मालकांसोबत झालेल्या करारानुसार १ मे २०१९ ते ३० जुन २०२४ या कालवधीतील भुई भाडे र.रू. ७,०५,४९,८०२/- + GST व सुरक्षा रक्षक देयक र.रू.१,५५,७६,०००/- + GST येवढे देयक येत असुन एकत्रितपणे र.रू. ८,६१,२५,८०२/- + GST च्या खर्चास सदरचा विषय मा. स्थायी समितीमध्ये दि.१७/०८/२०२३ रोजीच्या सभावृत्तांतानुसार ठेवावयाचा आहे. तसेच सदरची बाब अतिरिक्त बाब म्हणून मंजूर करणे व मोजमाप पुस्तकात नोंद घेण्यासाठी दि.३१/१२/२०२४ रोजी पर्यंत मुदतवाढ घेणे याशिवाय सदरची देयके जादा बाब म्हणून मंजुर करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.